



दैनिक
बातम्यांसोबत विचार देणारे
# सत्यप्रभा

**दुबई, अबुधाबीत मंगळवारपासून रंगणार टी-२० आशिया चषक क्रिकेटचा थरार!**

पान २ वर

## आरोग्य

### कॅन्सरला हरवणारी लस रशियात विकसित




**मॉस्को :** कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराला प्रतिबंध करणारी एक लस रशियाने विकसित केल्याचे जाहीर केले आहे. या लसचे रुग्णांवरील प्रयोग सुरू आहेत. प्रीक्लिनिकल ट्रायल यशस्वी झाली असून पुढील टप्प्याचे प्रयोग सुरू आहेत. आतापर्यंतच्या प्रयोगांमध्ये ट्युमरचा आकार ६० ते ८० टक्क्यांनी कमी करण्यात लस यशस्वी झाली आहे.

## संक्षिप्त

### पंतप्रधानांचा उद्या पूरग्रस्त भागाचा दौरा

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांत मुसळधार पावसामुळे पंजाबमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी पंजाबच्या दौऱ्यावर असणार आहेत. या दौऱ्यात ते पुरामुळे बाधित झालेल्या लोकांची आणि शेतकऱ्यांची भेट घेतील. याशिवाय, ते मदत कार्य आणि पुनर्वसन प्रयत्नांचा आढावाही घेतील. याशिवाय पंजाबमधील गुरुदासपूरला ते भेट देत आहेत. जम्मू आणि काश्मीर, गुजरात, राजस्थान, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंडसह अनेक पर्जन्यग्रस्त राज्यांनाही ते भेट देतील.

### दिल्लीत शिवसेना खासदारांची बैठक

**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती पदासाठी नऊ सप्टेंबरला होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एनडीएचा घटक पक्ष असलेल्या शिवसेना खासदारांची बैठक शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना संसदीय गटनेते खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सोमवारी दुपारी १२.३० वाजता दिल्लीत बोलावली आहे. खा. श्रीकांत शिंदे हे या निवडणुकीवर विशेष लक्ष ठेवून असून मतदान कसे करावे, काय काय काळजी घ्यावी, अशा सूचना करण्यात आली आहे.

### बॉम्बची धमकी देणाऱ्याला बेड्या

**मुंबई :** मुंबई पोलिसांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर धमकीचा मेसेज पावणाऱ्या अश्विनी कुमार याला दिल्ली पोलिसांनी अटक करुन मुंबई पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. अश्विनी कुमारने ४०० किलो आरडीएक्स स्फोटक ३४ गाड्यांमध्ये लावण्याची आणि एक कोटी लोकांचा बळी घेण्याची धमकी मुंबई पोलिसांच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवली होती. गौतम बुद्ध नगरच्या पोलीस आयुक्त लक्ष्मी सिंह यांनी या प्रकरणी पोलिसांना २५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

### १० लाखांचे बक्षीस असलेला नक्षली ठार

**रांची :** झारखंडमधील पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील चाईबासात रविवारी सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत नक्षलवादी अमित हांसदा उर्फ अपटन मारला गेला. झारखंड सरकारने अमित हांसदा याच्यावर १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. शोध मोहिमेदरम्यान ही कारवाई करण्यात आली.


**पुढच्या वर्षी लवकर या** म्हणत राज्यभरात बाप्पाला भावपूर्ण निरोप : पुण्यात ३६ तास मिरवणूक

# चुकले आमचे काही तर क्षमा असावी!

समुद्राला उधाण, ३६ तास प्रतीक्षा : चंद्रग्रहणाला काही मिनिटे शिल्लक असताना **लालबागच्या राजाचे** विसर्जन

वृत्तसंस्था। **मुंबई**

'गणपती बाप्पा मोरया..मंगलमूर्ती मोरया... पुढच्या वर्षी लवकर या, गणपती चालले गावाला, चैन पडेना आम्हाला...अशा भावना व्यक्त करत दहा दिवस मनोभावी सेवा केल्यानंतर शनिवारी लाडक्या गणरायाने निरोप घेतला. राज्यभरात मोठ्या जल्लोषात गणेश विसर्जन पार पडले. दुसरीकडे मुंबई-पुण्यामधील विसर्जन मिरवणुका मात्र रविवार म्हणजे दुसरा दिवस उलटला तरी सुरुच होत्या. त्यातही मुंबईसह संपूर्ण राज्याचे लक्ष असलेल्या लालबागच्या राजाचे विसर्जन समुद्राला आलेल्या भरतीमुळे तब्बल ३६ तासांच्या प्रतीक्षेनंतर रविवारी रात्री सव्वानऊच्या सुमारास झाले. चंद्रग्रहणाला काही मिनिटे शिल्लक असताना लालबागच्या राजाचे विसर्जन झाल्याने सर्वांना हायसे वाटले.




### कोळी बांधवांना मान...

परंपरेनुसार, लालबागचा राजाच्या विसर्जनाचा मान कोळी बांधवांना देण्यात आला. कोळी बांधवांकडून राजाचे मानाने विसर्जन करण्यात आले. तराफासोबत कोळी बांधवांच्या बोटी देखील समुद्रात होत्या. १० दिवसांपासून तहानभूक विसरुन बाप्पाची सेवा करण्यासाठी कार्यकर्त्यांची धावपळ सुरू होती. आज त्या बाप्पााला निरोप देताना कार्यकर्ते आणि भाविकांना अश्रू अनावर झाले. गणपती निघाले गावाला, चैन पडेना आम्हाला असे म्हणतानाच निरोप घेता आता आम्हा आज्ञा असावी देवा आज्ञा असावी, चुकले आमचे काही त्याची क्षमा असावी, अशी भावना यावेळी गणेशभक्तांच्या मनात लोटली होती.

राज्यातील बहुतेक शहर आणि गावांतील मिरवणुका आणि विसर्जन रात्री उशिरापर्यंत चालले. तथापि, पुणे आणि मुंबईतील मिरवणुका आणि विसर्जनाला रविवारची रात्र यावी लागली. शनिवारी सकाळी सहापासून मुंबईच्या मानाच्या गणपतींसह पुण्यातील मानाचे बाप्पा मिरवणुकीसाठी बाहेर पडले. रात्री उशिरा मानाच्या गणपतींचे विसर्जन झाले. मात्र, इतर मंडळातील बाप्पांचे विसर्जन होण्यासाठी पुण्यात बराच वेळ लागला. त्यामुळे रविवारी सायंकाळी चारच्या सुमारास तब्बल ३६ तासानंतर शेवटच्या बाप्पाचे विसर्जन झाले आणि मिरवणूक संपले. दुसरीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते ते लालबागच्या राजाच्या विसर्जनाकडे. आज प्रथमच लालबागच्या राजाच्या विसर्जनाला निसर्गाच्या अडथळ्यामुळे तब्बल ३६ तास लागले.

लालबागचा राजा शनिवारी सकाळी दहा वाजता आपल्या मंडपातून बाहेर पडला. त्यानंतर लाखो भक्तांसह बाप्पाची भव्य विसर्जन मिरवणूक निघाली. मुंबईत शनिवारी प्रचंड पाऊस झाला, तरीही बाप्पाची ओढ भाविकांमध्ये इतकी होती, की तेवढ्या पावसातही आपल्या गणरायाचे यावर्षीचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी रस्त्यावर तुफान गर्दी जमली होती. अवघ्या दहा किलोमीटर अंतर गाठण्यासाठी पान २ वर



**मुंबई : राज्यभरात शनिवारी गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या मुंबई येथील निवासस्थानी विराजमान गणरायाला निरोप देण्यात आला. विसर्जनापूर्वी बाप्पाची आरती करण्यात आली. बाप्पाला निरोप देताना खा. अशोकराव चव्हाण यांनाही ढोल वाजवण्याचा मोह आवरता आला नाही.**

मुंबई, पुणे, अमरावतीत उत्साहाला गालबोट!

## राज्यात १८ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था। **मुंबई**

राज्यात एकीकडे गणेश विसर्जनाचा सोहळा उत्साहात सुरु असताना शनिवारी दिवसभरात या उत्साहाला दुर्दैवी किनार लागली. पुणे, नांदेड, मुंबई आणि अमरावतीत विसर्जनासाठी गेलेल्या काहींचा पाण्यात बुडून आणि विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. यात पुणे जिल्ह्यात चार जणांचा मृत्यू झाला. तर नांदेडमध्ये गणपती विसर्जनासाठी गेलेल्या तिघांपैकी दोन जण वाहून गेले. मुंबईच्या साकीनाका परिसरात मिरवणुकीत विजेचा धक्का लागून एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर पाच जण जखमी झाले आहेत. राज्यत विविध ठिकाणी विविध प्रकारच्या घटनांत १८ जणांचा मृत्यू झाला आहे.

पुणे जिल्ह्यात चाकण परिसरात विसर्जनासाठी गेलेल्या चार जणांचा वेगवेगळ्या ठिकाणी पाण्यात बुडून मृत्यू झाला. वाकी खुर्द येथील भामा नदीत दोन तरुण बुडाले. यात २० वर्षांचा कोयाळी येथील विद्यार्थी आणि १९ वर्षांचा उत्तर प्रदेशातील तरुणाचा समावेश आहे. यापैकी एकाचा मृतदेह सापडला असून दुसऱ्याचा शोध सुरू आहे. याव्यतिरिक्त, बिरदवडी येथील एका विहिरीत आणि शेलपिंपळगाव येथील भीमा नदीत प्रत्येकी एक व्यक्ती बुडाला. मुंबईच्या साकीनाका परिसरात गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत विजेचा धक्का लागून एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. खैरानी रोडवरील श्री गजानन मित्रमंडळाची मिरवणूक सुरू असताना, मिरवणुकीच्या ट्रॉलीला लटकलेल्या ११ हजार व्होल्टेजच्या हाय टेन्शन वायरचा स्पर्श झाला. यात बिनू शिवकुमार (वय ३६) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर पान २ वर



विसर्जन मिरवणुकीनंतर ट्रकने चिरडले

## नांदेडच्या मामी-भाचीचा पुण्यातील अपघातात मृत्यू

प्रतिनिधी। **नांदेड**

राज्यभरात गणेश विसर्जनाचा उत्सव सुरु असतानाच काही ठिकाणी अपघाताच्या दुर्दैवी घटना समोर आल्या आहेत. नांदेडपासून जवळच असलेल्या गाडेगाव येथील दोन तरुण आसना नदीत बुडाले आहेत. त्यांचा रविवारी सायंकाळपर्यंत शोध लागला नव्हता. त्यात पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी गेलेल्या नांदेडच्या दोन महिलांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली पान २ वर



## गणेश विसर्जनासाठी गेलेले **तिघे बुडाले**

पाय घसरल्याने दुर्घटना ; एक बचावला, दोघांचा शोध सुरु

प्रतिनिधी। **नांदेड**

जिल्ह्यात गणेश विसर्जन उत्सात पार पडत असतानाच शनिवारी शहरालगतच्या गाडेगाव परिसरात एक दुर्दैवी घटना घडली. गणरायाच्या मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी गेलेले गावातील दोन तरुण आसना नदीत बुडाले, तर तिसऱ्या तरुणाला ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे वाचवण्यात यश आले आहे. या दोन तरुणांचा रविवारी सायंकाळपर्यंत शोध सुरू होता.



गणेश विसर्जन मिरवणूक सुरु असताना शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजता गाडेगाव येथून जवळ असलेल्या आसना नदी परिसरात विसर्जनासाठी गेलेल्या तरुणांपैकी बालाजी कैलास उबाळे (वय १८) आणि योगेश गोविंद उबाळे (वय १७) हे पान २ वर

मनपाकडून ९ हजार मूर्तींचे संकलन : **४४ हजार मूर्तींचे विसर्जन**

## ४८.२६७ टन जमा झाले निर्माल्य!

प्रतिनिधी। **नांदेड**

गणेशोत्सवात नांदेडकरांनी महापालिकेला सकारात्मक प्रतिसाद दिला. परंपरेचे भान जपत हा गणेशोत्सव नांदेडकरातर्फे साजरा केला गेला. विसर्जनाच्या दिवशी गणेशोत्सवात ४८.२६७ मेट्रिक टन निर्माल्य जमा झाले. तर मूर्ती संकलन केंद्रात नऊ हजारांहून अधिक मूर्ती संकलित झाल्या आहेत. पान २ वर




### आशिया हॉकी कप जेतेपद भारताकडे

वृत्तसंस्था। **नवी दिल्ली**

आशिया हॉकी कपच्या अंतिम फेरीत आज भारताने दक्षिण कोरियाचा धुव्वा उडवून जेतेपदावर नाव कोरले. भारताने आशिया कपचे जेतेपद चौथ्यांदा जिंकले आहे. भारतीय संघ या स्पर्धेत अजेय राहिला. भारताने या स्पर्धेत एकही सामना गमवला नाही. सुपर ४ फेरीतील एकमेव सामना दक्षिण कोरियासोबत झाला होता. हा सामना २-२ असा बरोबरीत सुटला होता. मात्र, अंतिम पान २ वर

## ओबीसी आरक्षणाला धक्का नाही

### एकाचे काढून दुसऱ्याला देणार नाही : मुख्यमंत्री

वृत्तसंस्था। **पुणे**

मराठा आरक्षण देताना आम्ही ओबीसींना कोणताही धक्का लावला नाही, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र न देता ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांनाच फक्त आरक्षणाचा लाभ मिळणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केले.

### नोकरी करणारे नाही तर नोकरी देणारे व्हा

हा कार्यक्रम जयंती पुरता नाही, तुम्ही कोण आहे लक्षात आले पाहिजे. आता मागे राहता कामा नये. आता पुढे गेले पाहिजे. समाज पाठीमागे राहणार नाही यासाठी राजे उमाजी नाईक महामंडळ स्थापन केले. त्या माध्यमातून १५ लाखांपर्यंत कर्ज तसेच दोन लाखांपर्यंत बिगर तारण कर्ज देण्यात येईल. हा समाज नोकरी देणारा झाला पाहिजे. महाज्योतीमधून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देण्यात येणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ओबीसी समाजाच्या विकासासाठी सरकार कटीबद्ध असून त्यांनी मागत राहावे, आम्ही शक्य तेवढे देत राहू असे आश्वासनही त्यांनी दिले. पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती पान २ वर

**जलसंपदा** | तीन जिल्ह्यांना २५ टीएमसी पाणी : शेतशिवार फुलणार!

## मराठवाडा नदीजोड प्रकल्पाला हिरवा कंदील!

वृत्तसंस्था। **मुंबई**

दुष्काळाने होरपळलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी एक मोठा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पांतर्गत नदीजोड योजना राबविणे व्यवहार्य असल्याचा सर्वेक्षण अहवाल नुकताच राज्य सरकारला मिळाला आहे. यामुळे मराठवाड्याच्या पाणीटंचाईवर काही प्रमाणात कायमस्वरूपी उपाय मिळण्याची शक्यता आहे. न्यूज १८ वाहिनीने हे वृत्त दिले आहे.



### पुढील प्रक्रिया काय?

सर्वेक्षणानंतर आता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला जाणार आहे. शासनाची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरू होईल. तज्ज्ञांच्या मते, संपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ५ ते ६ वर्षांचा कालावधी लागू शकतो.

या प्रकल्पामुळे लातूर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यातील सुमारे एक लाख हेक्टर शेती सिंचनाखाली येणार आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना पाणीपुरवठा होईलच, शिवाय ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील मोठ्या प्रमाणात सुटेल. दुष्काळी परिस्थितीत सतत पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या मराठवाड्याला या योजनेमुळे दीर्घकालीन दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धाराशिव आणि बीड हे जिल्हे कृष्णा खोऱ्यात येतात. याआधी राज्य सरकारने कृष्णा खोऱ्यातील २३.६६ टीएमसी पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला होता. प्रत्यक्षात फक्त सात टीएमसी पाणी मिळाले. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती कायम राहिली. अनेक वर्षांपासून पान २ वर

## भाजपा खासदारांसाठी कार्यशाळा

जीएसटी स्लॅबबद्दल पंतप्रधानांचे अभिनंदन करणार

वृत्तसंस्था। **नवी दिल्ली**

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमवीर भाजपाने आपल्या खासदारांसाठी दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित केली आहे. रविवारी (दि. सात) संसद संकुलातील जीएमसी बालयोगी सभागृहात कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही हजेरी लावली. पण, पुढल्या रांगेत बसण्याऐवजी ते सभागृहातील शेवटच्या रांगेत बसले. उत्तर प्रदेशातील गोरखपूरचे भाजपा खा. रवी किशन यांनी इंस्टाग्रामवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हा एक फोटो शेअर केला आहे.



खा. रवी किशन यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे, की पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपा खासदारांच्या कार्यशाळेत शेवटच्या रांगेत बसले. ही भाजपा संघटनेची ताकद आहे. येथे प्रत्येक कार्यकर्ता समान आहे. दरम्यान, मीडिया रिपोर्ट्सनुसार, केंद्र सरकारच्या जीएसटी सुधारणांना पाठिंबा देणारा भाजपा खासदारांच्या कार्यशाळेत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. तसेच जीएसटी दर कमी केल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेत पान २ वर

# दुबई, अबुधाबीत मंगळवारपासून रंगणार टी-२० आशिया चषक क्रिकेटचा थरार!

वृत्तसंस्था। अबुधाबी

आशिया चषकाचा टी-२० थरार मंगळवार (दि. नऊ) पासून संयुक्त अरब अमिरातीत अर्थात यूएईत सुरू होत आहे. अफगाणिस्तान विरुद्ध हाँगकाँग या सामन्याने स्पर्धेची सुरुवात होणार आहे. भारताचा पहिला सामना १० सप्टेंबरला यजमान संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध होणार आहे. स्पर्धेतील सर्व सामने भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होणार आहेत.

आशिया चषकासाठी सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, रिंकू सिंग असा भारतीय संघ आहे. दरम्यान, आशिया कपमध्ये टीम इंडियाने आतापर्यंत आठवेळा विजेतेपद पटकावले असून श्रीलंकेने सहा तर पाकिस्तानने दोन वेळा विजेतेपदाचा किताब जिंकला आहे. टीम इंडिया यावेळी नवव्यांदा आशिया कपचे विजेतेपद पटकावण्याचा प्रयत्न करेल. महत्वाचे म्हणजे भारतीय संघ आशिया कपच्या इतिहासात तब्बल ११ वेळा फायनलमध्ये

### भारताचे साखळी सामने

१० सप्टेंबर : भारत वि. यूएई – दुबई, १४ सप्टेंबर – भारत वि. पाकिस्तान – दुबई, १९ सप्टेंबर २ – भारत वि. ओमान – अबुधाबी




### नवा स्पॉन्सर कोण?

आशिया कपसाठी भारतीय क्रिकेट संघाची नवी जर्सी चाहत्यांसमोर आली आहे. संघातील स्टार ऑलराउंडर शिवम दुबेने सोशल मीडियावर फोटो शेअर करत या जर्सीची पहिली झलक दाखवली. ड्रीम ११ चा बीसीसीआयसोबतचा करार संपल्यानंतर नवा स्पॉन्सर कोण असेल याकडे क्रिकेट वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पोहोचला आहे. भारतीय संघाने १९८८, १९९० आणि १९९५ अशी सलग तीनवेळा विजेतेपदाची कामगिरी केली आहे. श्रीलंकेने २००४ आणि २००८ मध्ये खूप प्रयत्न केले पण भारतीय संघाचा हा सलग तीनवेळा जिंकण्याचा विक्रम मोडता आला नाही. आशिया कप स्पर्धेत टीम इंडिया हा असा एकमेव संघ आहे ज्याने सर्वाधिक धावांच्या फरकाने विजय मिळवला आहे. भारतीय संघाने २००८ मध्ये हाँगकाँगला विक्रमी २५६ धावांनी हरवून इतिहास रचला असता. हा विक्रम आजपर्यंत अखंड आहे. तर आशिया कपच्या इतिहासात सर्वात कमी चेंडूत विजय मिळवण्याचा रेकॉर्ड भारताच्या नावावर आहे. २०२३ मधील अंतिम सामन्यात टीम इंडियाने एकही विकेट न गमावता फक्त ३७ चेंडूत लक्ष्य सहज गाठले होते. आशिया कपमध्ये सर्वात जास्त षटकार मारण्याचा विक्रम भारताचे माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज रोहित शर्माच्या नावावर आहे. त्याने आशिया कपमध्ये ३७ सामने खेळले आहेत. या काळात त्याने ४० षटकार मारण्याचा पराक्रम केला आहे. भारताने यावेळी नवव्यांदा विजेतेपद जिंकण्याच्या दृष्टीने मैदानात उडी घेतली आहे. त्यासाठी बीसीसीआयने सूर्यकुमार यादवच्या रुपाने तरुण कर्णधाराकडे संघाची जबाबदारी दिली आहे. तसेच भारतीय संघातील अनेक चेहरे तरुण असल्याने टीम इंडियाला विजेतेपद मिळण्याच्या आशा बळावल्या आहेत. शुबमन गिल, हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल यांच्यासह अभिषेक वर्मासारखा तरुण चेहरी संघात आहे. शिवम दुबेने इन्स्टाग्रामवर टाकलेल्या फोटोमध्ये तो भारतीय संघाची नवी जर्सी परिधान केलेला दिसतो. जर्सीवर बीसीसीआयचा लोगो आणि आशिया कप २०२५ ची छाप असली तरी स्पॉन्सरची जागा रिक्त आहे. बीसीसीआयने नव्या स्पॉन्सरसाठी टेंडर काढले असून, बोली लावण्याची अंतिम तारीख १६ सप्टेंबर ठरवली आहे. त्यामुळे ड्रीम ११ जी जागा कोण घेणार याचे उत्तर त्यानंतरच मिळू शकेल. मात्र, सध्या तरी आशिया कप प्रायोजकाशिवाय भारतीय संघ मैदानात उतरणार आहे हे स्पष्ट झाले आहे.

## संक्षिप्त

### पीओके वंशाच्या महिला इंग्लंडच्या गृहमंत्री

**लंडन** : ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल केले आहेत. उपपंतप्रधान अँजेला रेनर यांच्या राजीनाम्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले. या बदलातील सर्वात मोठी नियुक्ती शबाना महमूद यांची आहे, ज्यांना ब्रिटनचे नवीन गृहसचिव पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. शबाना पाकिस्तानी वंशाच्या असून ही जबाबदारी मिळालेल्या त्या पाकव्याप्त काश्मीरमधील पहिल्या मुस्लिम महिला आहेत. शबाना महमूद जुलै २०२४ ते सप्टेंबर २०२५ पर्यंत लॉर्ड चान्सलर आणि न्यायमंत्री होत्या. २०२४ मध्ये त्या प्रथम खासदार म्हणून निवडून आल्या.

### मल्ल्या, नीरव मोदी तिहार तुरुंगाचे पाहुणे?

**नवी दिल्ली** : भारत गेल्या काही वर्षांपासून आर्थिक फसवणूक करून देशाबाहेर पलायन केलेल्या बड्या धेंडांना परत आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. विजय मल्ल्या आणि नीरव मोदी या हायप्रोफाईल आरोपींना लवकरच भारतात आणण्यात येणार आहे. सध्या या आरोपींवरील प्रकरणे ब्रिटेन कोर्टात प्रलंबित आहेत. आता त्यासाठीच्या हालचाली तेजीत आहेत. ब्रिटेनच्या काऊन प्रॉसिक्यूशन सर्व्हिसचे एक पथक भारतात आले. त्याने तिहार तुरुंगाची पाहणी केली. त्यांनी तिथल्या सोयी-सुविधांचा अंदाज घेतला. या टीमचा हा भारत दौरा महत्त्वपूर्ण मानण्यात येत आहे.

### ट्रम्प यांनी दिला टॅरिफमधून दिलासा

**वॉशिंग्टन** : अमेरिकचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक नवा आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार आता सोमवारी अमेरिकेचा व्यापारी करार झालेल्या देशांना टॅरिफमधून सुट मिळणार आहे. अमेरिकेशी औद्योगिक निर्यातीवर जे देश सामजंस्य करार करतील त्यांना यातून फायदा होणार आहे. निकेल, गोल्ड,फार्मास्युटिकल कंपाऊंड आणि केमिकल्स यावर जोर दिला जाणार आहे. याचा उद्देश्य जागतिक व्यापारला पुनर्गठित केले जाणार आहे. अमेरिकेचे व्यापारी नुकसान कमी करणे आणि व्यापारी भागीदारांशी अधिक सौदेबाजी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### विमानाचे इंजिन हवेतच बिघडले

**नवी दिल्ली** : दिल्लीहून इंदूरला जाणाऱ्या एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. १६१ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या या विमानाच्या इंजिनने हवेत काम करणे बंद केले. एका इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड आढळताच वैमानिकाने एअर ट्रॅफिक कंट्रोल (एटीसी) ला पॅन-पॅन संदेश पाठवला आणि विमान अहिल्याबाई होळकर विमानतळावर सुरक्षितपणे उतरले. विमानतळ संचालक विपिनकांत सेठ यांनी ही माहिती दिली. विमानातील सर्व १६१ प्रवासी पूर्णपणे सुरक्षित आहेत.

## पोलिसांचे नियोजन कोलमडले, मंडळांचे नियमांकडे दुर्लक्ष

# बाप्पाच्या निरोपासाठी पुण्यात लागले विक्रमी तब्बल ३६ तास!

वृत्तसंस्था। पुणे

दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर अनंतचतुर्थीला लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. मुंबईत लालबागच्या राजाच्या विसर्जनात भरती-ओहोटीचे विघ्न आल्याने विसर्जन रात्री उशीरापर्यंत रखडले. तर, दुसरीकडे पुण्यात गणेश विसर्जन मिरवणुकीने आजपर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. तब्बल ३६ तासांनंतर पुण्यातील गणेश विसर्जन रविवारी सायंकाळी चारच्या दरम्यान संपली. पुण्यात ७७ वर्षांत पहिल्यांदाच असे घडले. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीची फक्त महाराष्ट्रच नाही तर देशभर चर्चा रंगली.




### १९४८ ते २०२५ पर्यंतचा वेळा

१९४८ : ६ तास ३० मिनिटे, १९४९ : ८ तास, १९५२ : ९ तास, १९५३ : ९ तास, १९५४ : ११ तास, १९६७ : १७ तास, १९७८ : २१ तास, १९८९ : २९ तास, २००५ : ३३ तास, २०१६ ते २०१९ : २८ तास, २०२० ते २०२१ कोरोनामुळे मिरवणूक नाही. २०२२ : ३१ तास, २०२४ : ३० तास आणि २०२५ : ३६ तास.

दरम्यान, विसर्जनाची रात्र पुण्यात जल्लोषात पार पडली. मिरवणूक पाहून झाल्यानंतर पुणेकरांनी घर गाठण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य दिले. गर्दी टाळण्यासाठी अनेकांनी खासगी वाहने किंवा बसऐवजी मेट्रोचा सोपा पर्याय निवडला. मात्र, अपेक्षेपेक्षा जास्त प्रवासी मेट्रोत दाखल झाल्याने तुफान गर्दीची परिस्थिती निर्माण झाली होती. गेल्या काही दिवसांपासून गणरायाच्या आगमनासाठी आणि विसर्जनासाठी पुण्यात नियोजन सुरु होते. मात्र, या नियोजनावर पाणी फिरल्याचे दिसून आले. पुणे पोलिसांनी मिरवणुकीसाठी योग्य नियोजन केल्याचा दावा केला खरा प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच दिसली. मानाच्या पाच गणपतीचे विसर्जन नियोजित वेळेपूर्वी होऊनही नंतर मिरवणूक अत्यंत संथ गतीने पुढे सरकत असल्याने नागरिक हैराण झाले होते. मंडळांच्या कार्यकर्त्यांकडून होणारे नाच-गाणे आणि फटाक्यांची आतषबाजी यामुळे मिरवणुकीला उशीर होत गेला. विशेषतः अलका टॉकीज चौकात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गर्दीच्या ठिकाणी फटाके उडवल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. शेवटी रविवारी सायंकाळी चारच्या सुमारास तब्बल ३६ तासानंतर शेवटच्या गणपतीचे विसर्जन झाले. पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक सुरुवातीच्या काळातील सहा तासावरून ३६ तासांवर गेली. दरवर्षीपेक्षा यावर्षी जास्त वेळ लागला. पुण्याच्या गणपती विसर्जन मिरवणुकीचा ७७ वर्षांचा इतिहास आहे. यंदा मिरवणूक कमी वेळेत करण्यासाठी पुणे पोलिसांचे प्रयत्न अपयशी ठरल्याचे दिसत आहे. त्यामुळे सरासरी ३० तासांचा विक्रम यांना मोडीत निघाला आहे. पुण्यातील मुठा नदी घाटात पुण्यातील गणपतींचे विसर्जन केले जाते.

# देशभर होणार मतदार पडताळणी!

## राजकीय विरोधानंतरही डिसेंबरमध्ये सुरू होऊ शकते प्रक्रिया




वृत्तसंस्था। नवी दिल्ली

निवडणूक आयोग देशभरात विशेष सघन सुधारणा म्हणजेच (सामान्य शब्दात मतदार यादी पडताळणी) करण्याची तयारी करत आहे. याबाबत येत्या १० सप्टेंबर रोजी दिल्लीत एक बैठक होणार आहे. त्यानंतर यासंदर्भातील निर्णय होऊ शकतो. सर्व राज्यांचे मुख्य निवडणूक अधिकारी या बैठकीला उपस्थित राहतील. यामध्ये देशभरात एसआयआर आयोजित करण्याच्या रणनीतीवर चर्चा केली जाईल.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी फेब्रुवारीमध्ये पदभार स्वीकारल्यानंतर ही तिसरी बैठक असेल. निवडणूक आयोगाने म्हटले आहे, की बिहारनंतर, मतदारयादी तपासणीची प्रक्रिया देशभरात राबविली जाईल. ती वर्षाच्या अखेरीस सुरू होईल, जेणेकरून २०२६ मध्ये होणाऱ्या आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकांपूर्वी मतदारयादी अद्ययावत करता येईल. बिहारमध्ये एसआयआर अभियानादरम्यान एका महिन्यात सुमारे तीन कोटी मतदारांची पडताळणी झाली आहे. निवडणूक आयोगाच्या मते, एसआयआरचा उद्देश मतदारयादी अद्ययावत करणे आणि परदेशी नागरिक, मृत व्यक्ती किंवा स्थलांतरित झालेल्या अशा बेकायदेशीर मतदारांना काढून टाकणे आहे. मतदाराचे नाव २००३ च्या यादीत असेल तर कोणतेही कागदपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. फक्त फॉर्म भरावा लागेल. १ जुलै १९८७ पूर्वी जन्म झाला असेल तर जन्मतारीख किंवा जन्मस्थानाचा पुरावा द्यावा लागेल. जन्म १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ दरम्यान झाला असेल, तर जन्मतारीख आणि जन्मस्थान दोन्हीचा पुरावा द्यावा लागेल.

# अमेरिका लादणार रशियावर निर्बंध

वृत्तसंस्था। वॉशिंग्टन

रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला आहे. युक्रेनची राजधानी कीवमधील मंत्री परिषदेच्या इमारतीवर ड्रोन आणि क्षेपणास्त्राच्या मदतीने हा हल्ला केला. या हल्ल्यात मोठे नुकसान झाले आहे. हा विध्वंस पाहून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संतापले आहेत. व्हाईट हाऊसमध्ये माध्यमांशी बोलताना ट्रम्प यांनी ‘आता रशियावर अधिक कडक आर्थिक निर्बंध लादण्याची वेळ आली आहे’ असे सांगून रशियाला शिक्षा देण्याची घोषणा केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे, की हे युद्ध थांबवण्यासाठी आणि रशियाला चर्चेच्या टेबलावर आणण्यासाठी अमेरिका निर्बंध आणखी कडक करण्यात तयार आहे. आतापर्यंत लादलेले निर्बंध पुरेसे नाहीत. जर रशियाने आक्रमक हल्ले सुरू ठेवले तर आम्ही अधिक कठोर पावले उचलू. रशियाला युद्ध संपवण्यास आणि शांतता चर्चा सुरू करण्यास भाग पाडणे हे आमचे उद्दिष्ट आहे. रशियाची कृती जागतिक शांततेला धोक्यात आणत आहे असे म्हणत डोनाल्ड ट्रम्प यांनी युरोपियन मित्र राष्ट्रांनाही पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

# जपानी पंतप्रधानांचा तडकाफडकी राजीनामा

## मोदींसोबत केली होती बुलेट ट्रेनची सफर



वृत्तसंस्था। टोकियो

जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. सत्ताधारी लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (एलडीपी) मध्ये फूट पडू नये म्हणून इशिबा यांनी हे पाऊल उचलले आहे. जुलैमध्ये झालेल्या वरिष्ठ सभागृहाच्या (हाऊस ऑफ कौन्सिलर्स) निवडणुकीत इशिबा यांचे युती सरकार पराभूत झाले. इशिबा यांनी अलीकडेच याबद्दल माफी मागितली होती आणि राजीनामा देण्याचा निर्णय ते घेतील असे सांगितले होते. निवडणुकीतील पराभवानंतर एलडीपीमध्ये इशिबा यांना हटवा चळवळ तीव्र झाली होती. काही पक्षाचे नेते आणि खासदारांनी त्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते, ज्यामुळे त्यांची स्थिती कमकुवत झाली. आता एलडीपीमध्ये नवीन नेतृत्वाची शर्यत सुरू होऊ शकते. जुलैमध्ये झालेल्या निवडणुकीत इशिबाच्या लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (एलडीपी) आणि त्यांच्या मित्रपक्षांनी देशाच्या वरिष्ठ सभागृहात बहुमत गमावले. तथापि, त्यावेळी त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देणार नसल्याचे सांगितले होते. जपानी संसदेच्या वरिष्ठ सभागृहात एकूण २४८ जागा आहेत.बहुमत टिकवून ठेवण्यासाठी त्यांना या निवडणुकीत किमान ५० नवीन जागा हव्या होत्या. परंतु, त्यांना फक्त ४७ जागा मिळू शकल्या नाहीत.

## पान एकवरून

**राज्यभरात बाप्पाला भावपूर्ण निरोप....**

तब्बल २२ तास लागले.लालबागचा राजा आज सकाळी ८ वाजता गिरगाव चौपाटीवर दाखल झाला होता. त्यापूर्वीच अरबी समुद्राला भरती आल्याने विसर्जनात अडथळा निर्माण झाला. भरती आणि ओहोटीची परिस्थिती निर्माण झाल्याने विसर्जनाला साडेबारा ते १३ तास लागले. पाणी ओसरल्यानंतर तब्बल साडेआठ तासांनी बाप्पाची मूर्ती तराफ्यावर चढवण्यात यश आले. तेव्हा गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया, ही शान कोणाची, लालबागच्या राजाची... या जयघोषांनी सारा परिसर दुमदुमन गेला. लालबागच्या राजाला साडेचारच्या सुमारास तराफ्यावर चढवल्यानंतर पुन्हा काही काळ प्रतीक्षा करण्यात आली. रात्री ८ वाजून १० मिनिटांनी राजाची आरती करण्यात आली आणि त्यानंतर ९ वाजून १२ मिनिटांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने अरबी समुद्रात बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. विसर्जनापूर्वीच्या उत्तर आरतीला उद्योजक अनंत अंबानी उपस्थित होते. साश्रू नयनांनी भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. यावेळी भाविकांची तुफान गर्दी गिरगाव चौपाटीवर झाली होती. लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी भाविकांचा अलोट जनसागर उसळला होता.

राजाच्या मूर्तीची उत्तर आरती झाल्यानंतर मंडळाचे पदाधिकारी आणि अनंत अंबानी यांच्या उपस्थितीत अत्याधुनिक तराफा अरबी समुद्रात दोन ते तीन किलोमीटर आत गेल्यानंतर विसर्जन करण्यात आले. दरवर्षी लालबागच्या राजाचे सकाळी साडे आठच्या दरम्यान विसर्जन होते. मात्र, अरबी समुद्राला भरती आल्याने यावर्षी मूर्ती नव्या तराफ्यावर ठेवण्यात अडचणी निर्माण झाल्या. ओहोटी सुरु झाल्यानंतर नव्या तराफ्यावर गणपतीची मूर्ती ठेवण्यात आली. त्यानंतर पुन्हा एकदा दागिने आणि आभूषणे राजाला घालण्यात आली होती.

**गणेश विसर्जनासाठी गेलेले....**

दोघे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. त्यांच्यासोबत असलेला शैलेश इरबाजी उबाळे याला इतर तरुणांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात आले. ही घटना घडत असतानाच स्थानिकांनी तातडीने प्रशासनाशी संपर्क साधला. माहितीनुसार, गणेश मूर्ती विसर्जनासाठी गेलेल्या या तरुणांनी नदीत उतरून मूर्ती विसर्जन करत असतानाच अचानक एकाचा पाय घसरला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात तिघेही पाण्यात बुडू लागले. परिस्थिती लक्षात घेऊन घाटावर उपस्थित काही तरुणांनी शैलेश उबाळे याला बाहेर काढण्यात यश मिळवले. बालाजी आणि योगेश हे दोघे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच एसडीआरएफ पथक, महसूल विभाग, तसेच ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मात्र, शनिवारी रात्री अंधारामुळे शोध कार्यात अडथळा निर्माण झाला. रविवारी सकाळी पुन्हा शोधकार्य हाती घेण्यात आले होते. बालाजी उबाळे हा व्यावसायिक मोटरसायकल मेकॅनिक असून योगेश उबाळे एका कापड दुकानात काम करत होता. दोघेही गाडेगावचे रहिवासी असून, अत्यंत मेहनती आणि मनमिळावू स्वभावाचे असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. या दुर्दैवी घटनेने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

**नांदेडच्या मामी-भाचीचा.....**

जात आहे. या दोघी नात्याने मामी-भाची आहेत. अधिक माहितीनुसार, नांदेडच्या बळीरामपूर येथील रहिवासी प्रतिभा कृष्णा आंबटवार (वय ३२) आणि कादंबरी काशिनाथ गादेकर (वय १८) शनिवारी पुण्यातील भोसरी येथे गणेश विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांना एका भरधाव ट्रकने चिरडले. यात मामी-भाचीचा मृत्यू झाला. या घटनेने बळीरामपूर परिसरात शोककळा पसरली आहे. दोघींचे पार्थीव पुण्याहून बळीरामपूर येथे आणण्यात येणार आहे.

**राज्यात १८ जणांचा!....**

तुषार गुप्ता (१८), धर्मराज गुप्ता (४४), आरुष गुप्ता (१२), शंभू कामी (२०) आणि करण कानोजिया (१४) असे पाच जण गंभीर जखमी झाले. शहापूर तालुक्यातील आसनगाव येथील मुंडेवाडीमध्येही भारंगी नदीत गणपती विसर्जन करताना तीन तरुण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. यातील एका तरुणाला शहापूरमधील जीवरक्षक टीमने शोधण्यात यश मिळवले, मात्र उर्वरित दोघांचा शोध अद्याप सुरू आहे. अमरावती जिल्ह्यात विसर्जनाच्या वेळी तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये तीन तरुणांचा मृत्यू झाला. दर्यापूर शहरातील चंद्रभागा नदीत गणपती विसर्जनासाठी गेलेली ३२ वर्षीय मुक्ता श्रीनाथ ही तरुणी खोल पाण्यात गेल्याने बुडून तिचा मृत्यू झाला. दुसरी घटना धामणगाव रेल्वे तालुक्यातील वाघोली येथे घडली, जिथे २२ वर्षांचा युवक करण चव्हाण गणपती विसर्जनाच्या वेळी पाय घसरून पाण्यात पडला आणि पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून गेला. तिसरी घटना मेळघाटातील धूळघाट रोडवरील गडगा नदीपात्रात घडली. येथे अनिल माकोडे हा युवक गणपती विसर्जनादरम्यान वाहून गेला.

**ओबीसी आरक्षणाला....**

सोहळा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी ते बोलत होते. मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्र देणार नाही. काहीही झाले तर ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींसाठी योजना करणारे हे सरकार आहे, असे सांगून फडणवीस म्हणाले, की आमच्या सरकारचे धोरण पक्के आहे. एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केले ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठावाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल असे आपण सांगितले आहे. ओबीसींना जोपर्यंत मुख्य प्रवाहात आणणार नाही त्यावर त्याचा विकास होणार नाही. ओबीसी विकास होईपर्यंत शिवकार्य पूर्ण होऊ शकत नाही. कोणीही मनात शंका घेऊ नका. समाजाने मागण्या केल्या तर आम्ही मागण्या पूर्ण करू. तुम्ही मागत राहा, आम्हाला शक्य आहे तेवढे देत जातो, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**मराठवाडा नदीजोड....**

सांगली-कोल्हापूर जिल्ह्यांत पावसाळ्यात वाहून जाणारे कृष्णा-भीमा नद्यांचे अतिरिक्त पाणी उजनी धरणात आणून ते मराठवाड्याकडे वळवावे अशी मागणी होत होती. शासनाने यावर विचार करून जलसंपदा विभागाला व्यवहार्यता अहवाल तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार नुकताच सरकारकडे हा व्यवहार्य अहवाल सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे मराठवाड्याच्या दुष्काळी भागांना स्थायी उपाय मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील पिकांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होईल. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची कमतरता मोठ्या प्रमाणात कमी होईल. शेतकऱ्यांना दिलासा मिळून शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. गेल्या अनेक दशकांपासून मराठवाड्यात दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेती उत्पादनात घट हा कायमस्वरूपी प्रश्न राहिला आहे. हजारो शेतकरी दरवर्षी पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून असतात. याशिवाय, सिंचनासाठी पाणी उपलब्ध नसल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

**भाजपाची कार्यशाळा....**

पक्षाचा इतिहास आणि विकास, खासदारांसाठी कार्यक्षमता वाढवण्यासाठी टिप्स दिल्या जातील. ही कार्यशाळा चार सत्रांमध्ये होणार आहे. पहिले सत्र आत्मनिर्भर भारत, स्वदेशी भारत, व्यवसाय सुलभता आणि युवा शक्ती आणि रोजगार यावर असेल. दुसरे सत्र खासदारांनी सोशल मीडियाचा प्रभावी वापर कसा करावा यावर असेल. तिसरे सत्र खासदारांच्या स्थायी समितीच्या गटांवरील चर्चेवर असेल. चौथे सत्र सागरी प्रदेश, डाव्या विचारसरणीचा प्रदेश, ग्रामीण भाग, शहरी भाग, डोंगराळ आणि ईशान्य प्रदेश यावरील चर्चेवर आधारित असेल. खासदारांना उपराष्ट्रपती निवडणुकीवर प्रशिक्षण दिले जाईल. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन आणि विरोधी पक्षाचे उमेदवार न्या. बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात चुरस आहे. संख्याबळाच्या बाबतीत, एनडीएचे उमेदवार राधाकृष्णन यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

**४८.२६७ टन जमा...**

एकूण ४४ हजार ४७८ गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिली.

महापालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. तसेच नैसर्गिक स्त्रोतात मूर्ती विसर्जन न करता जास्तीत जास्त प्रमाणात मूर्ती दान करावे याबाबत क्षेत्रीय कार्यालयांमार्फत जनजागृती करण्यात आली होती. यानुसार क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्व कृत्रिम हौद व मूर्ती संकलनाच्या ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी १४ निर्माल्य कलश/कंटेनरची व्यवस्था करण्यात आल्याने एकूण ४८.२६७ टन निर्माल्य संकलन झाले. सर्व मूर्ती संकलन केंद्रावरील गणेश मूर्ती एकत्रित करून वाहतूक करण्यासाठी एकूण ३५ वाहने ठेवण्यात आली होती. त्याचप्रमाणे मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी २१ मोठ्या क्रेन ठेवण्यात आल्या होत्या. प्रत्येक विसर्जन घाटावर आवश्यक ती विद्युत रोषणाई व जीव रक्षकांची टीम तैनात करण्यात आली होती. गोदावरी व आसना नदीतील पाणी प्रदुषीत होऊ नये व जल संपत्तीचे रक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून पर्यावरण पुरक कृत्रिम तलावात लहान व मध्यम आकाराच्या मूर्ती आणि दोन्ही खदान तलावात मोठ्या मूर्तींचे विसर्जन करुन, पर्यावरणपुरक गणेशोत्सव पार पाडण्यात आला आहे.

**आशिया हॉकी कप...**

फेरीत भारताने दक्षिण कोरियाला पुन्हा संधी दिली नाही. पहिल्या मिनिटापासून भारतीय संघाने आघाडी घेतली. सुखजीत सिंगने ३० व्या सेकंदाला पहिला गोल केला. त्यामुळे दक्षिण कोरिया संघाची बरोबरीची धडपड सुरु झाली. मात्र त्यांना पहिल्या सत्रात तर बरोबरी काही साधता आली नाही. दुसऱ्या आणि तिसऱ्या सत्रात भारत आघाडी घेत राहिला. तर चौथ्या सत्रात एक गोल करण्यात कोरियाला यश आलं. पण, तोपर्यंत बराच वेळ झाला होता. दुसऱ्या सत्रात भारताने आणखी एका गोलची आघाडी घेतली. तिसऱ्या सत्रात भारताने ३-० ने आघाडी घेतली. चौथ्या सत्रात अमित रोहिदासने पेनल्टी कॉर्नरवरून भारतासाठी गोल करुन ४-० ची आघाडी घेतली. आणि भारताने विजेतेपदावर नाव कोरले.

संपादकीय

# गंगा आली हो अंगणी !

महाराष्ट्रातील किंवा एकूणच देशातील विविध नदीजोड प्रकल्पांचे उद्दिष्ट नैसर्गिक पाणी जोडणे आहे. त्यामुळे आंतर-खोऱ्या आणि अंतर्गत-खोऱ्यातील पाणी हस्तांतरणासाठी सहज आणि सोपे उत्तर मिळण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. राज्यातील उपलब्ध आणि दरवर्षी पावसामुळे निर्माण होणाऱ्या जलसंपत्तीच्या अधिक प्रभावी आणि सुयोग्य वापरासाठी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जातो. मराठवाडा-विदर्भ आणि दुष्काळ या नाण्याच्या दोन बाजू असल्याचे अनेकवेळा बोलले जाते. त्यातही अनेकवेळा नद्यांवर बांधलेल्या धरणांच्या समन्यायी पाण्यासाठी जिल्हा-जिल्हा वाद होतात. राज्यातील पाणीटंचाई, सिंचनाची गरज आणि जलस्रोतांचा अपुरा वापर लक्षात घेऊन विविध नद्या एकमेकांशी जोडण्याचा प्रयत्न नदीजोड प्रकल्पातून होणार आहे. यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये पाणीपुरवठा, सिंचन सुविधा आणि जलस्रोतांच्या संरक्षणाला प्रोत्साहन मिळू शकते. याच पार्श्वभूमीवर दुष्काळाने होरपळलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पांतर्गत नदीजोड योजना राबविणे व्यवहार्य असल्याचा सर्वेक्षण अहवाल नुकताच राज्य सरकारला मिळाला आहे. यामुळे मराठवाड्याच्या पाणीटंचाईवर काही प्रमाणात कायमस्वरूपी उपाय मिळण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामुळे लातूर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील सुमारे एक लाख हेक्टर शेती सिंचनाखाली येणार आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना पाणीपुरवठा होईलच, शिवाय ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील मोठ्या प्रमाणात सुटेल. दुष्काळी परिस्थितीत सतत पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या मराठवाड्याला या योजनेमुळे दीर्घकालीन दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धाराशिव आणि बीड हे जिल्हे कृष्णा खोऱ्यात येतात. याआधी राज्य सरकारने कृष्णा खोऱ्यातील २३.६६ टीएमसी पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला होता. प्रत्यक्षात फक्त सात टीएमसी पाणी मिळाले. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती कायम राहिली आणि टंचाईवर मात करण्याचे स्वप्नही पूर्ण होऊ शकले नाही. अनेक वर्षांपासून सांगली-कोल्हापूर जिल्ह्यांत पावसाळ्यात वाहून जाणारे कृष्णा-भीमा नद्यांचे अतिरिक्त पाणी उजनी धरणात आणून ते मराठवाड्याकडे वळवावे अशी मागणी होत होती. शासनाने यावर विचार करून जलसंपदा विभागाला व्यवहार्यता अहवाल तयार करण्याचे आदेश दिले होते. आता आलेला हा अहवाल सकारात्मक असल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. आता या सर्वेक्षणानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला जाणार आहे. त्यानंतर शासनाची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरू होईल. तज्ज्ञांच्या मते, संपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्यासाठी फार तर पाच ते सहा वर्षे लागतील. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा विभागात पाणीटंचाई एक गंभीर समस्या आहे. या प्रदेशांमध्ये कमी पाऊस, अनियमित पावसाळा आणि जलस्रोतांचा अपुरा वापर यामुळे पाण्याचा तुटवडा जाणवतो. त्यामुळे नदीजोड प्रकल्प या समस्येवर उपाय ठरू शकतो. शेतकर्यांना वेळेवर पाणी मिळत नाही. त्यामुळे पिकांची उत्पादकता कमी होते. सिंचनासाठी आवश्यक असलेला पाणीपुरवठा नियमित नसल्याने शेतकर्यांना नुकसान होते. नदीजोड प्रकल्पामुळे हे संकट कमी होऊ शकते. दुसरीकडे अनेक जलाशय आणि जलस्रोतांचा वापर योग्यप्रकारे होत नाही. काही ठिकाणी पाणी उपलब्ध असतानादेखील ते योग्यप्रकारे वितरित होत नाही. नदीजोड प्रकल्पामुळे जलसंचय वाढवून त्या पाण्याचा अधिक प्रभावीपणे वापर होऊ शकतो. शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे जलसंसाधनांवरील दबाव वाढत आहे. नदीजोड प्रकल्पामुळे पाणीवापराची अधिक कार्यक्षम व्यवस्था केली जाऊ शकते. ज्यामुळे शहरांमध्ये पाणीपुरवठा अधिक सोपा होईल. हवामान बदलामुळे पावसाच्या प्रमाणात असमानता निर्माण होत आहे. काही भागात अतिवृष्टी आणि काही ठिकाणी दुष्काळाचा अनुभव काही नवीन नाही. नदीजोड प्रकल्प या पाण्याच्या असमान वितरणाला संतुलित करू शकतो. केंद्र सरकारने २००२ मध्ये आंतर-खोऱ्यांचे पाणी हस्तांतरण कार्यक्रमाची घोषणा केली होती. यात द्वीपकल्पीय आणि हिमालयीन भारतातील वेगवेगळ्या नदी खोऱ्यांमधील ३० दुवे समाविष्ट आहेत. त्यातून देशाच्या टंचाईग्रस्त भागातील राज्यांना पाणीटंचाईतून मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्या अंतर्गत महाराष्ट्रात आंतरराज्यीय दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प व नारपार गिरणा नदी योजना, पार-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा एकदरे-गोदावरी या नदीजोड प्रकल्पांना राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पामुळे या परिसराचे रूप बदलून जाईल. त्यामुळे या भागातील जैवविविधता बदलू शकते. नद्यांची आंतरजोडणी कार्यक्रम राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. या कार्यक्रमाचे ध्येय पाणी वाटपात अधिक समता सुनिश्चित करणे आहे. यामुळे लाखो लोकांच्या पाण्याच्या गरजा पूर्ण होतील. आता कृष्णा-भीमा नदीजोड योजनेमुळे शेती सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची शक्यता आहे. नियोजनबद्धपणे ही योजना वेळेत पूर्ण झाली, तर मराठवाड्याच्या पाण्याच्या संकटावर काही प्रमाणात स्थायी उपाय मिळू शकेल हे निश्चित.

# स्थानिक निवडणुकीची शहनाई, पक्षीय मतपेरणी सुरू !

नंदीग्रामचा फेरफटका



**राजेश शिंदे**
वृत्तसंपादक, दैनिक सत्यप्रभा

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्या असून सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. पण, विधानसभा निवडणुकीतील अपयशानंतर काँग्रेसचा या निवडणुकीत कस लागणार आहे. भाजपने आक्रमक रणनीती आखल्याने काँग्रेससमोर मोठे आव्हान आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील फुटीचा थेट परिणाम निकालावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे पक्षांचे अस्तित्व टिकविण्याची लढाई आहे.**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांची घोषणा अद्याप औपचारिकरित्या झाली नसली तरी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व वरिष्ठ नेत्यांच्या भाषणातून ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये निवडणुका होतील हा संदेश वारंवार देण्यात येत आहे. त्यामुळे सर्वच पक्षांनी आपल्या गोटात मतपेरणीचे सुरू केली आहे. या निवडणुका फक्त जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका किंवा महापालिकांच्या चौकटीपुरत्या मर्यादित नसून, या लढतींतून भविष्यातील विधानसभेचे, लोकसभेचे समीकरणसुद्धा बदलू शकते. नांदेड जिल्हा म्हणजे काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र खा. अशोकराव चव्हाण यांचा भाजपात प्रवेश झाल्यानंतर काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला मोठा हादरा बसला. जिल्ह्यात एक नंबर असलेल्या काँग्रेसला विधानसभेत खाते ही उघडता आले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना विभागल्याने निर्माण झालेली परिस्थिती ही सुद्धा आगामी निवडणुकांतील एक महत्त्वाची बाजू ठरणार आहे.

नांदेड जिल्ह्यात भाजपने मोठ्या जोमाने तयारी सुरू केली आहे. माजी मुख्यमंत्री, खा. अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून येतो. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका व महापालिका या सर्व स्तरांवर भाजपचे वर्चस्व प्रस्थापित व्हावे यासाठी रणनिती आखली जात आहे. महानगराध्यक्ष, माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप शहरात संघटन मजबूत करत आहे. केंद्रातील मोदी सरकारने राबविलेल्या योजना, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला गॅस, शेतकऱ्यांसाठी पीएम किसान निधी अशा योजनांचा प्रचार कार्यकर्ते घराघरांत पोहोचवत आहेत. राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार कार्यरत असल्याने भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह अधिक वाढलेला दिसतो.


दुसरीकडे काँग्रेसचा विचार केला तर नांदेड जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र सद्या पक्षात सर्वांना एकत्र आणणारे नेतृत्व नाही. गट-तटाचे राजकारणामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. काँग्रेससमोर दोन प्रमुख आव्हाने आहेत, पक्षातील एकोपा राखणे व मतदारांचा विश्वास परत मिळवणे. ग्रामीण भागातही काँग्रेस बॅकफूटवर असल्याचे दिसते. काँग्रेसने संघटनेला नवसंजीवनी दिली नाही, तर बालेकिल्ला टिकवणे कठीण होईल. राष्ट्रवादी काँग्रेस या जिल्ह्यात ठराविक मतदारसंघापुरती मर्यादित आहे. पूर्वी अजित पवार व शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटित होता, मात्र आता दोन पक्ष झाल्याने कार्यकर्त्यांत विजयाबाबत संभ्रम आहे. अजित पवार गट सत्तेतील सहभागाच्या जोरावर मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहे. तर शरद पवार गट पारंपरिक विचारसरणी, जनआंदोलनाच्या ताकतीवर भर देत आहे. शिवसेनेबाबत बोलायचे झाले तर गेल्या महापालिकेत एकच नगरसेवक होता. हा पक्षाही उद्धव ठाकरे गट व एकनाथ शिंदे गट अशा दोन भागांत विभागला आहे. काही स्थानिक पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये जनसंपर्क वाढवत आहेत. त्यांनी सात वर्षे कोणतेही पद नसताना मतदारांमध्ये राखली आहे. त्यामुळे स्थानिक नेत्यांच्या जोरावर काही जागांवर शिवसेनेला संधी मिळू शकते.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये अजूनही व्यक्तीगत संबंध व जातीधर्माचे समीकरण महत्त्वाचे ठरते. भाजपने येथे मोठी गुंतवणूक सुरू केली आहे. शहरात पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन या मुद्द्यांवर पक्षांना मतदारांना भिडावे लागणार आहे. काँग्रेसने महापालिकेत बराच काळ सत्ता उपभोगली आहे, मात्र आता विरोधकांनी शहरातील विकास कामांना मुद्दा बनवला आहेत. जिल्हा परिषद पातळीवर ग्रामीण विकास निधी, शाळा, आरोग्य सेवा या विषयांवर प्रचार सुरू आहे. मतदारांची मनोवृत्ती या निवडणुकांत खरी निर्णायक ठरेल. शहरी मतदार विकास, रोजगार, उद्योग यावर भर देतो, ग्रामीण मतदार कृषी क्षेत्रांशी निगडित मुद्दे, पिकविमा, पाणीपुरवठा या मुद्द्यांकडे जास्त लक्ष देतो, तर तरुण मतदार नव्या नेतृत्वाच्या शोधात असून सोशल मीडियाच्या माध्यमातून पक्षांविषयी मत बनवतो. त्यामुळे पक्षांनी वेगळ्या पद्धतीने प्रचार धोरण आखणे आवश्यक ठरणार आहे.

आजच्या काळात सोशल मीडिया हा निवडणुकीतील प्रमुख शस्त्र ठरतो आहे. फेसबुक, व्हॉट्सअॅप, इंस्टाग्राम, युट्यूबवर पक्षांची पोस्ट्स, व्हिडिओज, थेट संवाद यांची रेलचेल आहे. भाजपकडे सोशल मीडियाची यंत्रणा मजबूत आहे. काँग्रेसने याबाबतीत ठोस पाऊल उचललेले नाही. तरुण मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी राष्ट्रवादी व शिवसेनाही प्रयत्न करत आहेत. अखेरीस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जरी स्थानिक असल्या तरी त्यातून पुढील राजकीय समीकरणांची पायाभरणी होते. नांदेड जिल्ह्यात भाजपने आक्रमक रणनीती आखल्याने काँग्रेससमोर मोठे आव्हान आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील फूटीचा निकालावर थेट परिणाम होणार आहे. या निवडणुका म्हणजे केवळ सत्ता मिळविण्याचा खेळ नाही, तर पक्षांचे अस्तित्व टिकविण्याची लढाई आहे. मतदार आपला निर्णय काय देतो त्यावरून नांदेड जिल्हा, तसेच मराठवाड्यातील राजकारणाचा नवा चेहरा पुढील पाच वर्षांसाठी निश्चित होणार आहे.

जगाच्या पाठीवर


# अमेरिकेत येणाऱ्या टपालात ८० टक्के घट




अमेरिकेने विविध देशांतून येणाऱ्या टपालांवरील कर वाढवले आहेत. त्यामुळे अमेरिकेला जगभारातून होणारी टपाल वाहतूक ८० टक्क्यांपेक्षा कमी झाली आहे, असे संयुक्त संयुक्त राष्ट्रांच्या एजन्सी युनिव्हर्सल पोस्टल युनियनने म्हटले आहे. या रिपोर्टनुसार, जगभरातील ८८ ऑपरेटर्सनी अमेरिकेला पार्सल पाठवणे पूर्णपणे किंवा अंशतः स्थगित केले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने जुलैच्या अखेरीस २९ ऑगस्टपासून अमेरिकेत येणाऱ्या लहान पार्सलवरील डी मिनिमिस सूट रद्द करत असल्याचे म्हटले. त्यानंतर जगभरातील टपाल कंपन्या व विविध देशांच्या टपाल विभागांनी अमेरिकेला पार्सल पाठवणे बंद केले. लहान पार्सलवर अमेरिकेत १९३८ पासून सुट लागू होती. यानुसार, ८०० डॉलर्स किंवा त्यापेक्षा कमी किमतीच्या वस्तू अमेरिकेत शुल्कमुक्त पाठवता येत होत्या. अमेरिकेच्या सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण एजन्सीच्या म्हणण्यानुसार, अमेरिकेत येणाऱ्या डी मिनिमिस पॅकेजची संख्या २०१४ मध्ये १४० दशलक्ष होती, ती २०२४ पर्यंत १.३६ अब्ज पॅकेज झाली. कमी किमतीच्या आयातीचा पूर अमेरिकेतील किरकोळ विक्रेत्यांना त्रासदायक ठरतो. जुन्या टपाल धोरणामुळे इतर देशातून वस्तू अनियंत्रितपणे येऊ शकतात. त्यामुळे अमेरिकेत फेंटानिल आणि इतर औषधे पाठवणे सोपे होते, असे टीकाकारांचे मत आहे. नवीन नियमांनुसार, अमेरिकेत पाठवले जाणारे सर्व पार्सलवर कर आकारला जाणार आहे. कर जमा करणे आणि कागदपत्रांवर प्रक्रिया करण्यासाठी पोस्टल ऑपरेटर आणि वाहतूक कंपन्या जबाबदार आहेत. पण, अमेरिकेने या एजन्सींना नवीन रचना प्रस्थापिक करण्यासाठी वेळ दिला नसल्याने टपालात घट झाली आहे. व्यवसायिक ग्राहकांसाठी अमेरिकेत पार्सल शिपिंग थांबवण्याची घोषणा करणाऱ्या पोस्टल सेवांच्या यादीत मेक्सिको, जर्मनी, फ्रान्स, स्पेन, इटली, ऑस्ट्रेलिया, जपान, तैवान, भारत आणि स्वित्झर्लंड यांचा समावेश आहे. अमेरिकेने धोरण जाहीर केल्यानंतर भारतीय टपाल विभागाने अमेरिकेत जाणारे पार्सल स्वीकारणे बंद केले आहे. त्याचा परिणाम, येत्या दिवाळीत अधिक दिसण्याची शक्यता आहे.

थोरांची शिकवण

# सत्य उतारा येऊन, अवघा सारिला तमोगुण



अग, ग...ग....ग... विंचू चावला
देवा रे देवा... विंचू चावला, काय मी करू...विंचू चावला... विंचू चावला..
विंचू चावला हो....या भारूडात संत एकनाथांनी मनुष्याच्या काम, क्रोधावर विनोदी अंगाने टिका केली आहे. मनुष्यात असलेल्या काम व क्रोधाचा विंचू चावल्याने माझ्या सर्वांगाला दरदरून घाम फुटला आहे. त्यामुळे माझे प्राण जातात की काय असे मला वाटत आहे. मनुष्यरुपी इंगळी अति दारूण असून हे विष उतरविण्यासाठी सत्वगुणाचा अंगारा लावा, असा उपदेश संत एकनाथांनी या भारूडातून केला आहे. आपल्या मराठवाड्यातील गोदावरीच्या काठावर असलेल्या पैठण नगरीचे भूषण म्हणजे संत एकनाथ. त्यांनी भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आणि त्या काळात भारूडाच्या माध्यमातून लोकप्रबोधन केले. संत एकनाथ महाराजांची शिकवण प्रेम, भक्ती, आणि समानतेवर आधारित आहे. त्यांनी समाजातील उच्च-नीच भेदभावाला तीव्र विरोध केला आणि मागासलेल्या व गरजू लोकांना जवळ केले. सर्व प्राण्यांवर प्रेम करण्याचा उपदेश केला आणि या शिकवणीचे प्रत्यक्षात पालन केले. भक्ती हेच देवापर्यंत पोहोचण्याचे साध्य आहे, अशी शिकवण दिली. त्यांनी श्री विठ्ठलावरील निस्सीम भक्तीचा प्रचार केला. संत एकनाथांनी प्रपंचात राहूनही सत्य कसे प्राप्त करता येते, हे आपल्या जीवनातून दाखवून दिले. संत एकनाथांनी समाजात समन्वय साधण्याचे कार्य केले. त्यांनी मराठी भाषेत अनेक भारुडे, अभंग आणि ओव्या लिहिल्या. त्यांच्या कार्यामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले आणि आजही भक्तांच्या हृदयात ते आदराने स्मरले जातात. संत एकनाथांची शिकवण ही प्रेम, भक्ती आणि समानतेवर केंद्रित होती. त्यांनी आपल्या जीवनातून आणि साहित्यातून समाजाला एकतेचा आणि समतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा आणि आचरणाचा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेवर खोलवर प्रभाव पडला आहे. त्यांनी दाखवलेल्या मार्गावरून चालणे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. त्यांनी दाखवलेला मार्ग सध्याच्या आधुनिक युगातही कालबाह्य झालेला नाही, तर त्यांची शिकवण अंगीकारण्याची सर्वाधिक गरज आहे.

# नेपाळमध्ये फेसबुक, युट्यूबसह सोशल मीडियावर बंदी

**नेपाळमध्ये फेसबुक, एक्स आणि युट्यू बसह बहुतेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ब्लॉक करण्यात आल्या आले आहेत. नेपाळ सरकारने या कंपन्यांना देशांतर्गत नोंदणी करण्यासाठी ३ सप्टेंबरची मुदत दिली होती. ही मुदत न पाळलेल्या अॅप्सवर कारवाई केली जात आहे. त्याच वेळी सोशल मीडियावर नियंत्रण आणण्यासाठी नवीन कायदा आणण्याची तयारी करण्यात आली आहे. सोशल मीडिया ब्लॉक केल्याचा स्थानिक नागरिकांनी निषेध केला आहे.**




नेपाळ सरकारने ४ सप्टेंबर रोजी फेसबुक आणि युट्यूबसह बहुतेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म तात्काळ प्रभावाने ब्लॉक केले आहेत. या कंपन्यांनी सरकारकडे नोंदणी करावे लागणारे नियम पाळले नाहीत, असे सरकारने म्हटले आहे. ब्लॉक केलेल्या सोशल प्लॅटफॉर्ममध्ये एक्स आणि लिंक्डइन या कंपन्यांचाही समावेश आहे. नेपाळचे दळणवळण आणि माहिती मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुड म्हणाले की, नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या सुमारे दोन डझन सोशल नेटवर्क प्लॅटफॉर्मना नेपाळमध्ये त्यांच्या कंपन्यांची अधिकृतपणे नोंदणी करण्याची सूचना दिली होता. त्यासाठी ३ सप्टेंबरपर्यंत वेळ देण्यात आला होता. एपी न्यूज एजन्सीनुसार, टिकटॉक आणि व्हायबरसह फक्त पाच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना नेपाळमध्ये काम सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे या कंपन्यांनी सरकारकडे नोंदणी केली आहे. याशिवाय दोन कंपन्यांची नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे.

या कंपन्यांनी देशातील स्थानिक संपर्क, तक्रारींचे निराकरण करण्यासाठी एक अधिकारी आणि नियमांचे पालन करण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी नेपाळ सरकारची इच्छा आहे. यासाठी, सरकारने संसदेत एक विधेयक आणले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म योग्यरित्या व्यवस्थापित केले जावेत आणि जबाबदारीची खात्री करणे, असा या विधेयकाचा उद्देश आहे. या विधेयकावर अद्याप संसदेत पूर्णपणे चर्चा झालेली नाही. हे विधेयक सेन्सॉरशिपचे एक साधन आहे आणि ऑनलाइन निषेध करणाऱ्यांवर बडगा उगारते, अशी टीका केली जात आहे. हा निर्णय अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाकारणे आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मानवाधिकार संघटनांनी म्हटले आहे. दुसरीकडे सामान्य लोक या विधेयकाला विरोध करत आहेत.नेपाळी अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, सोशल मीडियावर लक्ष ठेवण्यासाठी कायदा आणणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याचे वापरकर्ते आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म हे त्यावरील प्रसारित केल्या जात असलेल्या मजकुराला जबाबदार राहतील. या जबाबदारीची खात्री नवीन विधेयकामुळे होईल, असा नेपाळी अधिकाऱ्यांचा दावा आहे. डिजिटल राइट्स नेपाळचे अध्यक्ष भोलानाथ म्हणतात की, अचानक प्लॅटफॉर्म बंद करणे हे सरकारच्या वृत्तीचे दर्शन घडवते आणि हा निर्णय जनतेच्या मूलभूत अधिकारांवर थेट परिणाम करतो. सोशल मीडियाचे नियमन करणे चुकीचे नाही, परंतु प्रथम त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करावी लागेल.

नेपाळचा शेजारी भारतात माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ द्वारे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची जबाबदारी निश्चित केली आहे. यामध्ये, ११ प्रकारच्या कंटेंटला बेकायदा घोषित करण्यात आले आहे आणि सोशल मीडिया कंपन्यांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवरून असा कंटेंट काढून टाकणे कायदेशीररित्या जबाबदार धरेल आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास आयटी कायद्याच्या कलम ७९(१) अंतर्गत कंपन्यांना देण्यात आलेली सूट मागे घेतली जाऊ शकते. भारताच्या आयटी नियमांनुसार, अश्लील, बाल लैंगिक शोषण संबंधित कंटेंट आणि इतरांच्या शारीरिक गोपनीयतेचे उल्लंघन करणाऱ्या कंटेंटवर सोशल मीडियावर बंदी घालण्यात आली आहे. सोशल मीडियावर चुकीची माहिती शेअर करण्यावरही बंदी घालण्यात आली आहे. तसेच, एआयच्या मदतीने तयार केलेल्या डीपफेकवरही बंदी घालण्यात आली आहे.

**(दैनिक सत्यप्रभा डेस्क)**

निमित्त

# निरक्षरतेसंगे युद्ध आमुचे सुरू, जिंकू किंवा मरू




**आज ८ सप्टेंबर. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन. आधुनिक मानवी जीवनात साक्षरतेचे महत्त्व असाधारण आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने १९६७ पासून हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. न्याय्यावर आधारित, शांततापूर्ण आणि शाश्वत समाज निर्माण करण्यासाठी धोरणकर्ते, अभ्यासक आणि जनतेला साक्षरतेचे महत्त्व या निमित्ताने पटवून दिले जाते. त्यानिमित्त साक्षरता या विषयाचा उहापोह करणारा हा लेख.**

महात्मा फुले यांच्यासह सर्वच आर्वाचीन समाजसुधारकांनी शिक्षणाला महत्त्व दिले आहे. महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षि धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासह अनेकांनी समाजाला औपचारिक व आधुनिक शिक्षण देण्यासाठी देह झिजवला. सावित्रीबाई फुले व त्यांच्या सहकारी फातीमा बी यांच्यामुळे महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची रुजुवात झाली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर शासनाने शिक्षणाच्या सोयी निर्माण केल्या. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या पिढीला शिक्षण घेणे सोपे झाले. तरही २०११ च्या जनगणनेनुसार भारताचा साक्षरता दर ७४.०४ टक्के आहे. यापैकी, पुरुषांचा साक्षरता दर ८२.१४ टक्के आणि महिलांचा साक्षरता दर ६५.४६ टक्के होता. नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या २०२३-२४ च्या अहवालानुसार, भारताचा सध्याचा साक्षरता दर ८०.९ टक्के आहे. म्हणजे आणखी सुमारे १९ जनतेला अद्याप लिहता वाचता येत नाही. २०११ च्या जनगणनेनुसार, केरळ राज्यात सर्वाधिक साक्षरता दर ९३.९१ टक्के, त्यानंतर मिझोरममध्ये ९१.५८ टक्के, आणि गोवा राज्यातील ८८.७० टक्के जनता साक्षर आहे. बिहार राज्यात सर्वात कमी साक्षरता दर ६३.८२ टक्के आहे. अरुणाचल प्रदेश ६६.९५ टक्के आणि राजस्थानचा ६७.०६ खालून अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राचा साक्षरता दर ८२.३ टक्के होता. त्यात पुरुष साक्षरता दर ८८.४ टक्के तर महिला साक्षरता दर ७५.९ टक्के होता. सर्वाधिक साक्षरता मुंबई उपनगरात (८९.९ टक्के) तर सर्वात कमी साक्षरता नंदुरबार जिल्ह्यात (६४.४ टक्के) होती. त्याचवेळी २०११ च्या जनगणनेनुसार, नांदेड जिल्ह्याचा साक्षरता दर ७५.४५ टक्के आहे. नांदेड जिल्ह्यातील ८४.२७ टक्के पुरुष व ६६.१५ टक्के महिला साक्षरता होत्या. अर्थात गेल्या १४ वर्षांत ही संख्या नक्कीच वाढली असेल.

प्रौढ साक्षरता वाढवण्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार विविध उपाययोजना राबवत आहेत. केंद्र सरकारकडून नव भारत साक्षरता कार्यक्रम चालविला जातो. १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील निरक्षर लोकांना मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान देणे, असा या या योजनेचा उद्देश आहे. त्यासाठी २०२२ ते २०२७ हा कालावधीत निश्चित करण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार, केवळ वाचन, लेखन आणि अंकज्ञानच नाही इतर बाबींचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आरोग्य आणि जागरूकता, बाल संगोपन आणि शिक्षण ही महत्त्वाची जीवन कौशल्ये निरक्षरांना शिकविली जात आहेत. स्थानिक गरजांनुसार व्यावसायिक कौशल्ये प्रदान केली जात आहेत. यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस आणि नेहरू युवा केंद्रांच्या सदस्यांचे सहकार्य घेतले जात आहे. ही योजना राबवण्यासाठी ऑनलाइन अध्यापन, शिक्षण आणि मूल्यांकन प्रणालीचा वापर केला जातो.

महाराष्ट्रात केंद्र सरकारच्या नव भारत साक्षरता कार्यक्रमाच्या धर्तीवर सर्वांसाठी शिक्षण हा कार्यक्रम राबवला जात आहे. अनेक स्वयंसेवी आणि सामाजिक संस्था प्रौढ साक्षरता वाढवण्यासाठी सरकारसोबत काम करत आहेत. या कार्यक्रमांमध्ये प्रौढांना केवळ साक्षर बनवणेच नव्हे तर त्यांना समाजातील विविध बाबींची जाणीव करून देणे आणि त्यांना स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक करणे हे उद्दिष्ट आहे. मात्र १०० टक्के साक्षरता साध्य करण्याच्या मार्गात अनेक अडथळे आहेत. केवळ शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणेच नव्हे, तर समाजाची मानसिकता बदलणे आणि गरिबी दूर करणे यांसारख्या सामाजिक-आर्थिक समस्यांवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. भारत वेगाने विकसित होत असलेली अर्थव्यवस्था आहे. तिच्या विकासात निरक्षरता हा एक अडथळा आहे. त्यावर साक्षरता वाढवणे हाच एकमेव उपाय आहे.

सत्यप्रभा
हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२
**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
https://epaper.esatyaprabha.com
र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### विवाहितेला जीवे मारण्याचा प्रयत्न

**मुखेड :** सासरी तु नांदायला का आली असे म्हणत सासरच्या चौघांनी विवाहीता महादेवी अशोक पाटील हिला हात पाय धरून व विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रकरणी महादेवी हिच्या फिर्यादीवरून मुक्रामाबाद पोलीसांना आरोपी बालाजी गोविंद पाटील, सरोजा शिवाजी, किशोर महाले आणि अशोक बालाजी पाटील या चौघां विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तिघांची संगनमत करून एकास मारहाण ;गुन्हा नोंद

**नांदेड :** अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले घरांचे सर्वेक्षण करण्यासाठी पाकिजा नगर मध्ये आलेल्या महापालिका व तहसिलच्या कर्मचाऱ्यांना शेख मोहसीन शेख शादुला हे लोकांची घरे दाखवीत असतांना अब्दुल गफुर अ.सत्तार, अब्दुल खलील, सोहल खान या तिघांनी शेख मोहसीन यांना तु लोकांची घरे का दाखवतोस असे म्हणत थापड बुक्यानी मारहाण करून दुखातपत केली. ही घटना ३ सप्टेंबर रोजी दुपारी पाकिजा नगर मध्ये घडली याप्रकरणी शेख मोहसीन यांच्या फिर्यादीवरुन ग्रामिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**नांदेडः** शहरातील आनंद नगर भागात एका जुगार अड्ड्यावर विमानतळ पोलीसांनी छापा टाकून रोख ४५ हजार ५०० रूपये, १ लाख ५७ हजार ९०० रूपयांचे ७ मोबाईल असा एकूण २ लाख ३ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई ६ सप्टेंबर रोजी करण्यात आली.यावेळी आरोपी जोगिंदरसिंग रामगडिया रा.भगतसिंग रोड व अन्य ९ जुगाऱ्या विरूद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सपोउपनि आव्हाड करीत आहेत.

### विना परवाना देशी दारू पकडली

**तामसाः** हदगाव तालुक्यातील तळेगाव फाटा जयंत साहेबराव राठोड या इसमास विना परवाना देशी दारू भिंगरी संत्रा किंमत ३ हजार ८०० रूपये चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याच्या कारणावरुन तामसा पोलीसांनी देशी दारू जप्त करून आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दयानंद कदम यांचे निधन



**हदगावः** येथील पत्रकार दयानंद धोंडीबा कदम वय वर्षे ५७ यांचे ७ सप्टेंबर सकाळी ९ वाजता निधन झाले त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी चार मुली नातवंड असा मोठा परिवार आहे.

## ढोलतांशाचा गजर,गणपती बाप्पा.... मोरयाचा जयघोष

# लाडक्या बाप्पाला उत्साहात निरोप

प्रतिनिधी। नांदेड

गेल्या दहा दिवसांपासून शहरासह संपूर्ण जिल्ह्यात सुरू असलेल्या गणेशोत्सवाची सांगता अनंत चर्तुर्थीला शनिवारी अतिशय उत्साह वातावरणात झाली.यानिमित्तांनी सर्वत्र भक्तीमय वातावरण , ढोल तांशाचा गजर, गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करत लाखो भक्तांनी आपल्या लाडक्या देवतेला निरोप दिला.

यंदा गणरायाच्या आगमनानंतर जिल्ह्यात पावसाने धुमाकुळ घातला. काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी ढगफुटी सदृष्य पाऊस झाल्याने हाहाकार माजला होता. या अभुतपुर्व पावसामुळे जनजीवन पुर्णता ठप्प झालेले अस तांना बाप्पाच्या लाडक्या भक्तांनी मात्र धीर खचू न देता गणरायाची मनोभावे सेवा करून गणेशोत्वातील पावसाचे विघ्न बाजूला सारले.



### डिजे मुक्त गणेश विसर्जनाला प्रतिसाद

दहा दिवसाच्या या उत्साही सोहळ्याची शनिवारी विसर्जन सोहळ्याने सांगता झाली. गणेश मुर्तीच्या विसर्जनासाठी महापालिकेने शहरात क्षेत्रिय कार्यालय निहाय विसर्जनासाठी जयत तयारी केली होती. त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार न घडता विसर्जन सोहळा निर्विघ्न पार पडला. रात्री उशीरापर्यंत विसर्जनाच्या मिरवणुका सुरू होत्या. यंदा प्रशासनाकडून डिजे मुक्त आणि पर्यावरण पुरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे त्यास गणेश भक्तांकडूनही चांगला प्रतिसाद मिळला.

दरम्यान दहा दिवसाच्या या उत्साही सोहळ्याची शनिवारी विसर्जन सोहळ्याने सांगता झाली. गणेश मुर्तीच्या विसर्जनासाठी महापालिकेने शहरात क्षेत्रिय कार्यालय निहाय विसर्जनासाठी जयत तयारी केली होती. त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार न घडता विसर्जन सोहळा निर्विघ्न पार पडला.

रात्री उशीरापर्यंत विसर्जनाच्या मिरवणुका सुरू होत्या. यंदा प्रशासनाकडून डिजे मुक्त आणि पर्यावरण पुरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे त्यास गणेश भक्तांकडूनही चांगला प्रतिसाद मिळला.पारंपारिक वाद्यासह गणेश विसर्जन मिरवणूकीत ढोल, ताशे, लेझिम यांचा समावेश ठळकपणे दिसुन आला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर जिल्हा पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे कुठेही अप्रिय घटना घडल्याचे निदर्शनास आली नाही.पुढच्या वर्षी लवकर येण्याचे बाप्पाकडून अभिवचन घेवून लाडक्या भक्तांनी त्यांना जड अंतकरणाने निरोप दिला.

उमरीत शांततेत विसर्जन.

उमरी शहरासहित ग्रामीण भागातील गणेश विसर्जन शांततेमध्ये पार पडले . तालुक्यात एकूण १२९ गणेश मंडळांनी आपल्या लाडक्या बप्पाची स्थापना केली होती त्यापैकी ४४ मंडळांनी सात दिवसांमध्ये विसर्जन केले तर उर्वरित ८५ मंडळांनी ६ सप्टेंबर रोजी आपल्या लाडक्या बप्पाला निरोप दिला.नगर परिषदेच्या वतीने विसर्जनासाठी शहरातील तलावामध्ये व्यवस्था केली होती.

तहसीलदार मंजुषा भगत यांनी विसर्जन स्थळी उपस्थित राहून व्यवस्थेची पाहणी केली. त्यावेळेस त्यांच्यासोबत कर्मचारी गणेश मदने. व महसूल विभागाचे नायब तहसीलदार संजय सोलवनकर,कैलास देशमुख गोरठेकर उपस्थित होते.

उमरीचे पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. विसर्जनसोहळा अतिशय शांततेत आणि उत्साहात पार पडला.

## अर्धापूरात श्री गणरायाला भक्तीमय वातावरणात निरोप



प्रतिनिधी। अर्धापुर

गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात अर्धापूर येथील सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेश मुर्तीचे विसर्जन उत्साहात शांततेत पार पडले. शहरासह तालुक्यातील गणरायाला भक्तीमय वातावरणात निरोप देण्यात आला.

ढोल-ताशांच्या गजरात श्री गणरायाच्या विसर्जनाची मिरवणूक काढण्यात आली. ठिक-ठिकाणी महाप्रसाद वाटप करण्यात आला. भक्तीमय वातावरणात गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

कडेकोट पोलीस बंदोबस्तात शांततेत गणेश विसर्जन पार पडले. ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. भक्तीमय वातावरणात गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

विसर्जनस्थळी नगरपंचायत व पोलीस विभागाचे कर्मचारी हजर होते. ठिक -ठिकाणी महाप्रसाद व भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली होती. ढोल-ताशांच्या गजरात गणरायाच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेत उपविभागीय पोलिस अधिकारी डॅनियल बेन व पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णुकांत क-हाळे यांनी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. यावेळी ड्रोन कॅमेराद्वारे मिरवणुकीतील प्रत्येक हालचालींवर पोलीस प्रशासनाची करडी नजर होती.

## भाजपाच्यावतीने शहरात ठिकठिकाणी गणरायांना भक्तीमय वातावरणात निरोप

प्रतिनिधी। नांदेड




भाजपा महानगराध्यक्ष माजी आ.अमरनाथ राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाच्यावतीने शहरात अनंत चर्तुर्थीनिमित्त ठिकठिकाणी गणरायाला निरोप देण्यात आला.

यानिमित्त मित्रता सांस्कृतिक मंडळच्या वतीने आयोजीत कै.मदन मामा देशपांडे भंडाराचे उदघाटन करण्यात आले.यावेळी भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांनी श्री गणेश विसर्जन मिरवणुकीच्यावेळी विविध ठिकाणी उपस्थित राहून गणेश मंडळाचे स्वागत केले. तसेच विविध गणरायाच्या मुर्तीना पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले.यावेळी त्यांच्या हस्ते महाप्रसादाचेही वाटप करण्यात आले. यावेळी आ.आनंदराव पाटील बोंढारकर, भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, माजी महानगराध्यक्ष प्रविण साले, जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड.चैतन्यबापु देशमुख, महेश खोमणे, माजी महापौर अजयसिंह बिसेन, दक्षिण विधानसभा प्रमुख डॉ. सचिन उमरेकर, सरचिटणीस शितल खांडील, विजय येवनकर, आनंदीदास देशमुख , डॉ.बालाजी गिरगावकर, गंगाधर बडवणे, गुरूप्रितसिंग संधू, सुरेश लोट, रविकिरण पोतदार, सुहास किवळकेकर, रवि जाधव, जयंत रामा पोतदार,बालाजी वडजकर, किशन पटाले, लिंगोजी नंदाने, आनंदीदास कानोले, चंद्रशेखर सौंदनकर, अनिल बोधनकर, धनंजय साले, सुभाष निल्लावार,प्रितम डोईफोडे,पांडूरंग कदम आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## नापिकीस कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी। भोकर

नापिकीस व बँकेचे कर्ज कसे फेडावे या विवंचनेतुन कांडली येथील शेतकरी साईनाथ रामलू गंदमवाड याने विषारी औषध पिऊन आत्महत्या केली .

कांडली येथील शेतकरी साईनाथ गंदमवाड वय ४० यास सततची नापिकी व बँकेचे कर्ज कसे फेडावे या विवंचनेने ग्रासले होते. रविवार दि .७ सप्टेंबर रोजी याच काळजीतुन त्याने सकाळी विषारी औषध पिऊन आत्महत्या केली.

या प्रकरणी जलाराम गंदमवाड यांनी भोकर पोलीस ठाण्यात दिलेल्या खबरी वरून आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पोलीस निरिक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक राचलवाड हे पुढील तपास करत आहेत .

## सांगवी विसर्जन घाट येथे दत्ता पाटील कोकाटे यांच्यावतीने महाप्रसाद वाटप



प्रतिनिधी। नांदेड

नांदेड.श्री अनंत चतुर्दशी निमित्त भाजपा महानगर उपाध्यक्ष दत्ता पाटील कोकाटे यांच्या वतीने आसना नदी विसर्जन घाट, सांगवी बू येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, महानगर अध्यक्ष तथा माजी आमदार अमरनाथ राजूरकर, भाऊराव चव्हाण साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, संचालक मारोतराव गव्हाणे पाटील, आयोजक तथा उपाध्यक्ष दत्ता पाटील कोकाटे, दक्षिण विधानसभा अध्यक्ष सचिन उमरेकर, विजय येवनकर, शीतल खांडील,भुजंगराव कोकाटे, माजी नगरसेविका नागाबाई भुजंगराव कोकाटे, सखाराम तुप्पेकर, सदाशिव पुरी, तरोडा- सांगवी मंडळाध्यक्ष सुनील राणे, रमेश कोकाटे, चक्रधर कोकाटे, अंकुश कोकाटे लखन जोंधळे, गणेश कोकाटे, श्रीराम कोकाटे, निखिल पुरी, शाम कोकाटे, राजेश कोकाटे, माणिक कोकाटे, तुळशीदास कोकाटे, मारुती शिंदे, राजू पवार, सचिन कोकाटे, बाळू देवकत्ते, प्रकाश लोणे, गजानन कोकाटे, दीपक लोणे, निखिल हासेवाड, निशांत जोगदंड, अमोल महिपाल, संतोष कोकाटे आदी उपस्थित होते.



**नांदेडः** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या गणेश मंडळाची आरती बँकेचे उपाध्यक्ष माजी आ.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या हस्ते करून श्री गणरायाला निरोप दिला.यावेळी मुख्यकार्यकारी अधिकारी अजय कदम यांच्यासह बँक कर्मचारी उपस्थित होते.

## एसपी कार्यालयात उमाजी नाईक जयंती

प्रतिनिधी। नांदेड

जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार यांच्या मार्गदर्शनाखालील पोनि सुर्यमोहन बोलमवाड यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिक्षक कार्यालयातील अधिकारी, अमलदार उपस्थित होते.

## फिटनेस' थांबला' ; व्यायाम प्रेमींमध्ये निराशा, प्रशासानाने लक्ष देण्याची मागणी

# मोफत जीम सापडली गवत-झुडपांच्या विळख्यात

प्रतिनिधी। नांदेड



शहरातील चैतन्यनगर परिसरात महादेव मंदिराजवळ उभारण्यात आलेल्या मोफत जिमची आज बिकट अवस्था झाली असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने जून महिन्यात सुरू करण्यात आलेल्या या जिमला शहरातील तरुणाई, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत होता. सकाळ-संध्याकाळी शेकडो नागरिक येथे व्यायामासाठी येत होते. मात्र, केवळ काही महिन्यांतच या जिमचे रूपांतर ओसाड जागेत झालेले दिसत आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून झालेल्या सततच्या पावसामुळे या शासकीय जागेत पाणी साचून राहिले आहे. जिमच्या चारही बाजूंनी काटेरी झुडपे व गवत वाढले असून व्यायामासाठी उभारण्यात आलेली बरीच साधने गवत व दूषित पाण्याच्या विळख्यात अडकली आहेत. परिणामी, तब्बल १० ते १२ व्यायाम साहित्य आज वापरात नसल्याने नागरिकांना फक्त दोनच साधनांचा उपयोग करून घ्यावा लागत आहे. व्यायामासाठी सकाळी व संध्याकाळी गर्दी करणारे तरुण-तरुणी, महिला-पुरुष आणि लहान मुले प्रतीक्षा करून सुद्धा हवे तसे व्यायाम करू शकत नाहीत.मोफत जिमची ही अवस्था पाहता स्थानिक रहिवासी हतबल झाले आहेत. नागरिकांचे म्हणणे आहे की, जिम सुरू करताना प्रशासनाने शहरवासीयांच्या आरोग्याची काळजी घेतली होती; मात्र नंतरच्या देखभालीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. नांदेड महापालिका व संबंधित विभागाचे लक्ष अद्याप या गंभीर समस्येकडे गेलेले नसल्याने शहरातील शेकडो फिटनेसप्रेमींचा त्रास वाढला आहे.

व्यायाम हा नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक घटक आहे. मोफत जिममुळे सर्वसामान्यांना आरोग्यसाधना सहज उपलब्ध झाली होती; पण अल्पावधीतच झालेल्या या दुर्दशेमुळे आरोग्यप्रेमींना मोठा धक्का बसला आहे. नागरिकांनी तातडीने या जिमची स्वच्छता करून सर्व साहित्य वापरण्यास योग्य करावे, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

शहरातील चैतन्यनगर परिसरातील रहिवाशांसह व्यायामप्रेमींची एकच मागणी आहे ''जिम पुन्हा पूर्ववत सुरू व्हावा आणि सर्व साधने नागरिकांच्या सेवेत उपलब्ध व्हावीत.'' आता प्रशासन किती लवकर या मागणीला प्रतिसाद देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ईद-ए-मिलादनबीनिमित्त रक्तदान शिबिर

प्रतिनिधी। धर्माबाद

ईद-ए-मिलादनबीनिमित्त धर्माबाद शहरात पहिल्यांदाच मुस्लिम समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला सर्व धर्मीय नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात तब्बल २६७ रक्तदात्यांनी सहभाग घेतला.या उपक्रमाचे अध्यक्षस्थान उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गव्हाणे, पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणूगोपाल पंडित, धर्माबाद शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. कमल किशोर काकानी, माजी नगराध्यक्ष बन्नाळीकर व निलावार, माजी नगरसेवक वर्णी नागभूषण, समीर अहमद, युनूस खान, संजय पवार, शिवसेना (उबाठा) चे उपजिल्हा प्रमुख गणेश गिरी, कृष्णा तिम्मापुरे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुदर्शन वाघमारे, सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. इकबाल शेख, तसेच डॉ. लक्ष्मीनारायण केशटवार, डॉ. युसुफ पठाण, शंकर बोलमवार आदी मान्यवर उपस्थित होते.

**उत्सव** | भाजपा नेते माजी सभापती श्रावण भिलवंडे यांच्या पुढाकारातुन नरसी येथे विविध कार्यक्रम

# गणेश विसर्जनाचा सोहळा पदाधिकाऱ्यांच्या संगीतमय स्वागताने ठरला अविस्मरणीय

प्रतिनिधी । नांदेड

अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर नरसी नगरीत यंदाचा गणेश विसर्जन सोहळा एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाने विशेष ठरला. माजी सभापती व भाजपा नेते श्रावण भिलवंडे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या संगीतमय स्वागत सोहळ्याने भक्तिभाव, संस्कार आणि जल्लोषाचा अद्भुत संगम घडवून सर्वांच्या मनावर अमिट ठसा उमटवला.

नायगांव तालुक्यातील नरसी येथे शनिवारी झालेल्या या विसर्जन मिरवणुकीत नरसी जुनेगाव, बजरंग नगर, बुरुड गल्ली, बालाजी नगर, दत्तनगर, शामनगरसह विविध भागांतील गणेश मंडळांनी सहभाग नोंदवला. गुलालाची उधळण, भगव्याने फडफडणारे गगनचुंबी ध्वज, महिलांची पारंपरिक फुगडी, भजनी मंडळांचे सादरीकरण आणि ढोल-ताशा-मृदुंगाचा गजर या सर्वामुळे नरसी नगरी भक्तिरसात न्हावून निघाली. विशेष म्हणजे, डीजेमुक्त वातावरणात पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले.याचसोबत बिलोली रोडलगत उभारलेल्या खास संगीत मंचावर भक्तिगीतांची मैफल रंगली. एकापेक्षा एक सरस रचना व नृत्यांनी गणेशभक्त मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाची रंगत चढत असतानाच श्रावण भिलवंडे यांनी सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या योगदानाची दखल घेतली. या गौरवामुळे उपस्थितांमध्ये समाधानाची लहर पसरली. मिरवणुकीदरम्यान तेजोमय महाआरती करून गणरायाच्या चरणी साकडे घालताना ''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'' अशा जयघोषाने वातावरण दुमदुमले. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत झालेला हा सोहळा भक्तिभाव आणि उत्साहाचा संगम ठरला. नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत श्रावण पाटील भिलवंडे यांच्या नेतृत्वगुणांनाही दाद दिली.

या सोहळ्यात पोलीस पाटील ईब्राहिम बेग पटेल, सेवा सोसायटीचे प्रशासकीय चेअरमन गजानन भिलवंडे, उपसरपंच प्रतिनिधी अलीम बेग पटेल, माजी चेअरमन मारोतराव भिलवंडे, साईनाथ आक्कमवाड, गंगाधर वडगावे, नारायण खनपट्टे, राम खनपट्टे, मारोती वडगावे, हणमंत मिसे, बालाजी चिंतावार, त्र्यंबक डाके, मारोती बुक्के, राजू वडगावे, दिगंबर भिलवंडे, सय्यद इस्माईल, लक्ष्मण बोधणे, साईनाथ पांचाळ, विनोद भिलवंडे, रमेश वासरे, मारोती मिसे, सुरेश बट्टेवाड, माधव तेलमवार, नंदु कोरे, सुनिल वडगावे, संतोष तळणीकर, गोविंद दासरवाड आदींसह नरसी वासियांची मोठी उपस्थिती होती.



### भक्तिरस, जल्लोष आणि संस्कारांचा संगम

अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर नरसी नगरीत यंदाचा गणेश विसर्जन सोहळा अनोख्या उपक्रमामुळे लक्षवेधी ठरला. माजी सभापती व भाजपा नेते श्रावण भिलवंडे यांनी आयोजित केलेल्या संगीतमय स्वागत सोहळ्याने भक्ती, संस्कार आणि जल्लोषाची त्रिवेणी सजवली.

### डीजेमुक्त विसर्जन

विसर्जन मिरवणुकीत नरसी जुनेगाव, बजरंग नगर, बुरुड गल्ली, बालाजी नगर, दत्तनगर, शामनगरसह अनेक गणेश मंडळांचा उत्साही सहभाग दिसुन आला.यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. गुलालाची उधळण, भगव्याने सजलेले ध्वज, महिलांची पारंपरिक फुगडी, भजनी मंडळांची भक्तिगीते आणि ढोल-ताशा-मृदुंगाचा गजर यामुळे संपूर्ण नायगाव तालुक्यासह नरसी नगरी भक्तिरसात न्हावून निघाली.

### भिलवंडे यांनी केला सत्कार

बिलोली रोडलगत खास उभारलेल्या संगीत मंचावर भक्तिगीतांची मैफल रंगली. एकापेक्षा एक सरस रचना व नृत्यांनी गणेशभक्त मंत्रमुग्ध झाले.याचसोबत श्रावण भिलवंडे यांनी सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार करून त्यांच्या योगदानाची दखल घेतली.नरसीत या आगळ्या वेगळ्या संगीतमय स्वागत सोहळ्याची सर्वत्र चर्चा ऐकावयास मिळाली.